नवाकाळ शब्दकोडे-२६९

आडवे शब्द – २. सीतेला रावणाने कैदेत ठेवलेली जागा ७. गरीबी ११. कठीण (प्रसंग) १३. नाइलाज झालेला, मजबूर १५. खारफुटीचे जंगल, ही झाडे जमिनीची धूप थांबवतात १७. मोगलांना जेरीस आणणारे दोन सरदार- संताजी व xxx १८. माया, ममता १९. खुर्चीचा फायदा घेऊन समोरच्याचे नुकसान करणारा कारकून २०. सावली २१. दरवाजा २२. झुला, झोपाळा २३. सदावर्त २५. वनस्पती, पाने वगैरेत आढळणारा कीटक २७. विषारी २८. गोंधळ, घोटाळा ३०. चंद्र, चांदोबा ३२. तोंडपाठ ३३. तलाठी ३५. साळुंकी ३६. घोड्याच्या तोंडातला मोठा घास ३७. आपल्या शीघ्रकाव्यामुळे प्रसिद्ध नेता - xxxx आठवले ३९. इनामदार, ज्याला वतन आहे तो ४१. मालीश, मसाज ४३. हवेतील शुष्कता व उष्णता ४४. शासन ४५. फांदी, उपकचेरी ४७. नौका ४८. अवसान ५१. वरणाची डाळ ५३. वार्धक्य ५६. नेत्रहीन, आंधळा ५७. या पदार्थातून प्रकाश आरपार जाऊ शकत नाही ५८. वंदन ६०. प्रकट ६२. आटा ६३. खुलासा, स्पष्टीकरण ६५. किताब, पदवी ६७. पत्त्यांचा खेळ ६९. समुद्रकिनाऱ्यावरचे आर्द्र हवामान ७२. नौका ७४. योग्यता, पात्रता ७५. राख ७६. सैल अंगरखा ७७. शाही सलामी ७९. धैर्य, संयम ८०. हुक्की ८१. आयुर्वेदिक औषधगोळी ८२. अतिशय मोठे ८३. विशेष ८५. पाणी ८६. पार्वती ८९. संपर्क, संभाषण ९२. भेग, चीर ९३. नाशवंत ९४. चेहरा ९५. उबदार पांघरुण ९७. सरदार सरोवर प्रकल्पाची नदी ९८. रात्रीचा पाऊस १००. सुरुवातीचा अर्धा भाग १०१. उत्तराचलातील एक महत्वाचे तीर्थक्षेत्र- 'xxxनाथ' १०२. स्वयपाक १०३. आधारासहित १०४. नवथर, अनुनभवी १०५. शाही घोडागाडी

उभे शब्द – १. शक, साल, वर्ष ३. दुःखद शेवट असलेले कथानक ४. मुकटा, सोवळ्यातले वस्त्र ५. अंथरुणाची गुंडाळी ६. आश्चर्य ८. प्रतिध्वनी ९. ठार करणे १०. विराजमान, आसन ग्रहण केलेला १२. कृष्णाने बालपणी ठार केलेला नाग १३. वादग्रस्त १४. टोचणी १६. मिठाला न जागणारा, कृतघ्न २०. विद्यार्थी २२. थैली २३. अस्थिर, न टिकणारी गोष्ट, वरिष्ठांची चंचल मर्जी २४. गुन्ह्याचा तपास २५. घोडा २६. मदत करणे, बाजू घेणे २८. घुटका २९. काशी ३१. शिष्य, पट्ठा ३२. कटी ३३. मोठा तळ असलेले उथळ भांडे ३४. पद्धत ३५. केक, रोटी वगैरेसाठी लागणारे पीठ ३७. रक्षण, रखवाली ३८. समर्थ रामदासस्वामींनी लिहिलेला ग्रंथ ४०. नाकातील एक पारंपरिक दागिना ४१. प्रतिकूल मत होणे ४२. कैफ, धुंदी ४६. कंडू ४९. वरवर पाहता ५०. बघणारा, प्रेक्षकवर्ग ५२. शकून बघण्याची कथित विद्या ५४. नृपती ५५. ओझे ५६. डोळ्यात टाकण्याचे औषध ५७. अचानक ५९. रोख, कॅश, रोकड ६१. मेंदी ६४. शान, थाटमाट ६६. आदर आणि दरारा ६८. उठाव ७०. फोलपट ७१. अर्थार्जन करणारा ७३. औषधी गुण असलेले लाल चंदन ७४. वंचित ७८. अभिनेत्री ८०. बाजू घेणारा ८२. लोकात असलेले प्रतिकूल मत ८४. धर्मशाळा ८७. लिहिलेले ८८. विपूल ८९. वाढवणे, विकास करणे ९०. देवी सरस्वती ९१. मौनव्रत धारण केलेला ९६. दहशत, धाक ९८. मोहरी ९९. घर फिरले की हा खांबदेखील फिरतो १०१. मोराचे ओरडणे •



नवाकाळ कोडे क्रमांक २६८ चे उत्तर

आडवे शब्द : १. लालसा ४. दुरापास्त ९. जिव्हाळा १०. लव्लाही १२. धाकदपटशा १४. नटराज १६. भामटा १७. सूप १८. श्वासनलिका २०. राशिभविष्य २३. कीचक २६. वन २९. खाज ३०. बरा ३१. दक्षिण काशी ३३. लतामंडप ३५. दत्तात्रय ३७. तनू ३९. दमामा ४१. रसा ४२. कृष्णा ४३. तास ४५. रवळनाथ ४९. जात ५०. अनारसा ५२. गप्पीदास ५४. मण ५५. सावजी ५६. याई ५९. अनुताप ६१. मास ६२. नरसिंहावतार ६६. गज ६७. संततधार ७१. बहर ७२. पण ७३. कातळ ७४. सुसंगत ७६. बेट ७७. कर्मठ ७८. तरवणी ७९. गिरी ८०. कुऱ्हाड ८३. वाळा ८४. मकबरा ८६. सरहद्द ८८. खवचट ९०. लावणी ९२. वासा ९४. आवश्यक ९६. पशू ९७. लगबगीने १००. काख १०१. जालिंदरनाथ १०३. वगर १०४. रव १०५. नगदी १०६. चकणे १०७. गुलामी

उभे शब्द : १. लाव्हारस २. लळा ३. हावरा ४. दुही ५. पागा ६. एकटाकी ७. आपसूक ८. निशा १०. लटका ११. लाजरा १२. धाम १३. टप १४. नलिन १५. दंभ १६. भाष्य १८. श्वान १९. नवरात्र २१. शिबिका २२. विघ्न २४. चवड २५. राजकुमार २७. विक्षिप्त २८. उतावीळ ३०. बत्तासा ३२. शीत ३४. पद ३५. दरड ३६. यकृत ३८. नूर ४०. मानस ४३. तानाजी ४४. सर ४६. वश ४७. नाग ४८. थप्पी ४९. जाणता ५०. अवचित ५१. सायास ५३. दानव ५४. मनुज ५७. सरबत ५८. वैरण ५९. अगतिकता ६०. पसंत ६१. मार ६३. सिंह ६४. हार ६५. तापट ६८. तळतळाट ६९. धास्तावलेला ७०. प्रासंगिक ७३. काठ ७५. गरीब ७६. बेडर ८१. ऱ्हास ८२. रद्द ८३. वाचक ८४. मणी ८५. रावा ८७. हलगी ८८. खवखव ८९. वश्य ९१. वजीर ९३. सालगडी ९४. आकार ९५. कालिंदी ९६. पथक ९८. गर ९९. नेहमी १०१. जाग १०२. नाच

सरकारच्या चहापानावर विरोधी पक्षांचा बहिष्कार

पान १ वरून

भवितव्याबाबत प्रश्न प्रलंबित असून त्यावर काहीही निकाल लागला नाही. त्यातच अधिवेशन कमी कालावधीचे आहे. आम्ही दहा दिवस अधिवेशन घेण्याची मागणी केली होती. मात्र त्यावर विचार करू असे सांगण्यात आले. एकंदरीतच अतिवृष्टी झाली आहे. वैणगंगा नदीला पूर आला असून भंडारा, गोंदियामधील वाहतूक विस्कळीत झाली आहे. ज्याप्रकारे मदत व्हायला हवी होती, ती शेतकऱ्यांना मदत झाली नाही. हे मुद्दे आम्ही अधिवेशनात मांडणार आहोत. अतिवृष्टीग्रस्तांच्या मागण्या आहेत. ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ७५ आणि बागायतीसाठी दीड लाख रुपये मदत जाहीर करा. अतिवृष्टी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा, अशी मागणी अजित पवार यांनी यावेळी केली. ते पुढे म्हणाले की, सरकार कुणाचेही असले तरी गरीब, शेतकरी अडचणीत असेल तेव्हा भरीव मदत करण्याची गरज आहे. मात्र तसे सरकारकडून होत नाही. जे महत्त्वाचे विषय आहे, ज्याच्यावर चर्चा व्हायला हवी, मात्र क्षुल्लक विषयांवरच चर्चा अधिक होते. आता मधेच 'वंदे मातरम्' काढले. त्याला विरोध करण्याचे कारण नाही. मात्र महागाईबद्दल काय निर्णय घेणार, जीएसटी कमी करण्यासंदर्भात काय भूमिका घेणार, इंधन दरवाढ किंचित कमी केल्याचे अजित पवार यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, मंत्रिमंडळात महिलांना प्रतिनिधीत्व नाही. खातेवाटप उशिरा झाले. उद्या प्रश्नोत्तरे ठेवले नाही. तशा प्रकारची तयारी विधिमंडळाची झालेली नाही. प्रश्नांची उत्तरे मिळत नाही, ही शोकांतिका आहे. हे सरकार येऊन काही दिवस झाले असतानाच यांचे काही आमदार हे महाराष्ट्रात संघर्ष पेटविण्याची भाषा करतात. शिवसैनिकांचे हात तोडा, पाय तोडा, ही काय पद्धत आहे का? एकनाथ शिंदेंना, फडणवीसांना, भाजपला पटतं का?, असा सवालही अजित पवारांनी यावेळी उपस्थित केला.

२८ सप्टेंबरला लताजींच्या जयंती दिनी संगीत महाविद्यालय सुरू करावे -मुख्यमंत्री

मुंबई

भारतरत्न दिवंगत लता मंगेशकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू करण्यात येणारे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय हे त्यांच्या जयंती दिनी २८ सप्टेंबर रोजी सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज यासंदर्भात बैठक झाली. शिंदे म्हणाले की, जागेअभावी संगीत महाविद्यालय सुरू करण्यास वेळ लागू नये, यासाठी तात्पुरत्या जागेची सुविधा उपलब्ध करून तातडीने यावर्षी किमान प्रमाणपत्र कोर्स सुरू करावा. त्यानंतर टप्प्याटप्प्याने पदविका आणि पदवी कोर्स सुरू करण्यात यावेत. हे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय आहे. तेवढेच दर्जेदार महाविद्यालय असले पाहिजे आणि तातडीने सुरू करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असेही शिंदे यांनी बैठकीत सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पससमोर उच्च व तंत्र शिक्षण विभागाची जागा असून त्याच जागेत भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी एका समितीची स्थापनाही करण्यात आली होती. या समितीने यावर्षी सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचा अहवाल लवकर सादर करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. महाविद्यालय यावर्षी सुरू करण्यास जागेअभावी अडचण येऊ नये म्हणून पु.ल.देशपांडे कला अकादमी मध्ये तात्पुरते महाविद्यालय सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. २८ सप्टेंबर रोजी भारतरत्न लता मंगेशकर यांची जयंती आहे. यानिमित्त यावर्षी पहिली बॅच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कर्नाटक मंत्री मधुस्वामींची ऑडिओ क्लिप व्हायरल

बंगळुरू

कर्नाटकचे कायदामंत्री जेसी मधुस्वामी यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. ज्यामध्ये 'आम्ही सरकार चालवत नाही, आम्ही फक्त सांभाळत आहोत' असे त्यांनी म्हटले आहे. जेसी मधुस्वामी यांच्या या वक्तव्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मधुस्वामी आणि चन्नापटनाचे सामाजिक कार्यकर्ते भास्कर यांच्यातील फोनवरील संभाषण शनिवारी समोर आले. भास्कर याने व्हीएसएसएन बँकेविरुद्ध शेतकऱ्यांबाबत केलेल्या तक्रारींना उत्तर देताना मधुस्वामी म्हणाले, आम्ही येथे सरकार चालवत नाही, आम्ही ते कसे तरी सांभाळत आहोत आणि पुढील ७-८ महिने कसे तरी सांभाळायचे आहे.''

तिरुपतीच्या भाविकांना लाडूतून मिळणार नैसर्गिक गोडवा

हैदराबाद

देशातील सर्वांत श्रीमंत समजल्या जाणाऱ्या आंध्रातील तिरुपती बालाजी मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांना लवकरच शून्य आधारित अर्थसंकल्पीय नैसर्गिक शेती म्हणजेच सेंद्रिय उत्पादन आणि कीटकनाशके, रासायनिक खते आणि पालापाचोळा मुक्त कृषी उत्पादनापासून तयार करण्यात आलेला नैसर्गिक गोडव्याचा नैवेद्यम, लाडू प्रसादम आणि अन्न प्रसादम मिळणार आहे.

या मंदिराशिवाय अण्णावरम, श्रीकलाहस्ती आणि श्रीसैलमसह अन्य १२ मंदिरांमध्येही हा प्रसाद मिळणार आहे. आंध्र प्रदेश विपणन महासंघ खरेदी करून कीटकनाशक मुक्त कृषी मालापासून तयार केलेले लाडू, प्रसाद या १२ मंदिरांनाही पुरविणार आहे. स्वयंपाकाच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी देवस्थानने पुढाकार घेतला आहे. झिरो बजेट नैसर्गिक शेती हा उपक्रम २०१६ मध्ये आंध्र प्रदेशात सुरू झाला होता. राज्याने ६.२५ लाख शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यामुळे हा जगातील सर्वांत मोठा नैसर्गिक शेती कार्यक्रम बनला.

मुंबई, पुणे, साताऱ्यात कोसळधारा

पान १ वरून

जळगाव, कोल्हापूर या ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, रत्नागिरी, सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे बुधवारी आणि गुरुवारी होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्व परीक्षा रद्द करण्याचा निर्णय परीक्षा विभागाने घेतला आहे. विदर्भातील भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात गेल्या ३६ तासांपासून जोरदार पाऊस कोसळला आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तसेच भंडारा-गडचिरोली रस्ताही बंद करण्यात आला आहे. वैनगंगा नदीला पूर आला आहे. गावकऱ्यांना प्रशासनाने सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. या पावसामुळे घराचे आणि शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. गोसीखुर्द धरणातून मोठ्या प्रमाणात वैनगंगा नदीत होत असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे लाखांदूर तालुक्यातील वाहणाऱ्या चूलबंद नदीवरील सर्व पूल पुराच्या पाण्याखाली आले आहेत. यात लाखांदूर, भागडी चीचोली, मांढाल दांडेगावर, बोठली धरमापुरी, ताई बार्व्हा, दिघोरी मोठी पालांदुर पुलाचा समावेश असून प्रत्येक पूल पुराच्या पाण्याखाली आल्याने तालुक्यातील अनेक गावांची वाहतूक ठप्प झाली होती. मुंबईसह उपनगरांतही मध्यरात्रीपासून पावसाने हजेरी लावली. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. तर काही सखल भागांत पावसाचे पाणी साचले होते. या पाण्यातूनच मुंबईकरांना वाट काढावी लागत होती. हवामान तज्ज्ञ डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांनी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. यासंदर्भात त्यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. होसाळीकर यांच्या अंदाजानुसार मुंबई, सातारा, पुण्यासह कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यांनी ट्विट करत सांगितले आहे की, मुंबई, उपनगरात सकाळपासून पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. ढगाळ आकाश आणि पश्चिम मध्य प्रणालीचा परिणाम म्हणजे उत्तर कोकण बाजूच्या खालच्या पातळीवर पश्चिमेकडील भाग मजबूत होत आहे.

फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
(नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	केसर मल्टिमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक	३०.११.२०११
३.	प्राधिकरण, ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे	आरओसी - मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U74120MH2011PLC222597
५.	कॉर्पोरेट ऋणकोचा नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	ओरिएंटल हाऊस, ७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
६.	कॉर्पोरेट ऋणकोची दिवाळखोरी सुरू झाल्याचा दिनांक	दि. १७.०२.२०२२ (दि. १७.०२.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत अंतरिम ठराव व्यावसायिक यांना दि. ०४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाली.)
७.	स्वारस्य अभिव्यक्तीच्या आमंत्रणाचा दिनांक	१७.०८.२०२२
८.	कोड च्या कलम २५ (२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असलेले ठिकाण :	https://www.kesarmultimodal.com/ आणि https://ssarviconsultancy.com/
९.	कलम २९ ए अन्वये लागू अपात्रता नियम उपलब्ध असलेले ठिकाण :	https://www.kesarmultimodal.com/ आणि https://ssarviconsultancy.com/
१०.	स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त करण्याचा अंतिम दिनांक	दि. ०२.०९.२०२२
११.	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याचा दिनांक	दि. १२.०९.२०२२
१२.	तात्पुरत्या यादीस आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. १७.०९.२०२२
१३.	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याचा दिनांक	दि. २७.०९.२०२२
१४.	संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मूल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती जारी करण्याचा दिनांक	दि. १७.०९.२०२२
१५.	ठराव योजना, मूल्यांकन नमुना, माहिती निवेदनपत्रिका आणि अधिक माहिती मिळविण्याकरिता विनंतीची पद्धत	ठराव व्यावसायिक केवायसी, गुंतवणुकीची क्षमता, व्यवस्थापनेची क्षमता आणि आयबीसी, २०१६च्या कलम २९ए अन्वये पात्रता आणि पूर्व-पात्रता यांची पडताळणी केल्यानंतर ठराव व्यावसायिक ठराव योजना/मूल्यांकन नमुना/माहिती निवेदनपत्रिका इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सामायिक करतील.
१६.	ठराव योजना सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. १७.१०.२०२२
१७.	ठराव व्यावसायिकाकडे ठराव योजना सादर करण्याची पद्धत	अनुक्रमांक २१ मध्ये नमूद केलेल्या ईमेल आयडीवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात
१८.	निवाडा प्राधिकरणाकडे मंजुरीकरिता ठराव योजना सादर करण्याचा अंदाजित दिनांक	धनको समिती (सीओसी) द्वारे मंजूर केल्यावर लगेच.
१९.	ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	श्री. प्रशांत जैन (IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131)
२०.	ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि ईमेल, मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार	श्री. प्रशांत जैन पत्ता: ए-५०१, सांघी हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे ठाणे, नवी मुंबई महाराष्ट्र - ४००७०९. ईमेल आयडी: ipprashantjain@gmail.com
२१.	ठराव व्यावसायिकासोबत पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	बी/६१०, बीएसईएल टेकपार्क, वाशी रेल्वे स्थानकासमोर, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. ईमेल: kmll.cirp@gmail.com
२२.	अधिक तपशील मिळण्याचे ठिकाण	https://www.kesarmultimodal.com/ आणि https://ssarviconsultancy.com/
२३.	फॉर्म जी प्रसिद्धीचा दिनांक	दि. १७.०८.२०२२

दिनांक: १७.०८.२०२२ सही/-
ठिकाण: मुंबई सीए प्रशांत जैन
केसर मल्टिमोडल लॉजिस्टिक्स लिमिटेडकरिता ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131

त्या ११ नराधमांना गुजरात सरकारने मुक्त सोडले!

पान १ वरून

समितीने त्यांना मुक्त करण्याचा निर्णय घेतला. या समितीचे प्रमुख पंचमहलचे जिल्हाधिकारी सूजल माएत्रा यांनी म्हटले की, समितीने एकमताने निर्णय घेतला की, सर्व ११ आरोपींना माफी द्यावी. समितीचा निर्णय राज्य सरकारला कळविण्यात आला. त्यानंतर सर्वांना तुरुंगातून मुक्त करण्याचा आदेश देण्यात आला.

जन्मठेप म्हणजे १४ वर्षांची कैद, त्यानंतर दोषीचे वय, वागणूक पाहून त्यांना मुक्त करण्याचा अधिकार सरकारला आहे. या दोषींनी सुटकेसाठी अर्ज केल्यावर समितीने निर्णय घेतला.

मात्र या निर्णयामुळे संतापाची लाट उसळली आहे. अत्यंत भयंकर हत्याकांड आणि अत्याचार करणार्यांना निर्दोष सोडल्याबद्दल गुजरात सरकारवर सडकून टीका होत आहे. डिसेंबर महिन्यात गुजरात राज्यात विधानसभा निवडणुका असल्याने राजकीय दृष्टीकोनातून हा निर्णय झाला असल्याची शक्यता आहे. मार्क्सवादी नेत्या सुभासिनी अली, राजदचे इजाज अहमद, काँग्रेसचे कपिल सिब्बल, राष्ट्रवादीचे माजिद मेनन या सर्वांनी या निर्णयावर कडाडून टीका करताना म्हटले की, गुजरात सरकारचा हा निर्णय धक्कादायक आहे. १४ वर्षे कारागृहात काढल्यानंतर सुटकेसाठी अर्ज करण्याचा हक्क असला तरी ज्यांच्यावर अत्याचार झाले त्यांचा विचार करूनच हे निर्णय झाले पाहिजेत. कुणालाही असे मुक्त करणे योग्य नाही. एकीकडे 'नारी सन्मान' म्हणायचे आणि दुसरीकडे सरकारने हे असे निर्णय घ्यायचे हे क्लेशदायक आहे.

बिल्कीस बानो खटला

पान १ वरून

कुटुंबाने तिला आश्रय दिला. त्यानंतर धैर्य करून तिने घडलेल्या घटनेची आणि तिच्यावर झालेल्या अत्याचाराची पोलीस तक्रार केली.

तिच्या जबाबात अनेक विसंगती आहे असे म्हणून एक वर्षांनी मॅजिस्ट्रेटने पुराव्याअभावी हा खटला बंद केला. बिल्कीसने केंद्रिय मानव हक्क आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. २००३ साली सुप्रीम कोर्टाने सीबीआयला चौकशीचे आदेश दिले. बिल्कीस बानोने जबाबात ज्यांची नावे घेतली होती, त्यांना अटक झाली. त्यानंतर खटल्याची जशी प्रगती होत गेली तशा बिल्कीस बानोला जीवाच्या धमक्या येऊ लागल्या. पुढील दोन वर्षांत तिला वीस वेळा निवासस्थान बदलावे लागले. तिने शेवटी हा खटला गुजरातमधून मुंबईला हलवा, अशी विनंती केली. २००८ साली मुंबईच्या न्यायालयाने २० आरोपींपैकी १३ आरोपींना दोषी ठरविले. त्यातील ११ दोषींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. या अकरा जणांपैकी जसवंत नाई, गोविंद नाई आणि शैलैश भट्ट यांना फाशीची शिक्षा व्हावी, असा अर्ज सीबीआयने मुंबई उच्च न्यायालयात केला. त्याबरोबर निर्दोष ठरविलेल्या ७ आरोपींविरोधातही सीबीआयने दाद मागितली. २०१७ साली मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष ठरविलेल्या सातही जणांना दोषी ठरविले. मात्र सर्व ११ आरोपींना फाशीची शिक्षा देण्यास नकार देत त्यांची जन्मठेपेचीच शिक्षा कायम ठेवली.

बिल्कीस बानोची तक्रार लिहून न घेणारा आणि खोटी नोंद करणारा लिमखेडा पोलीस स्टेशनचा सोमाभाई घोरी याला तीन वर्षे कैदेची शिक्षा मुंबईच्या न्यायालयाने दिली होती. मात्र तोपर्यंत घोरीचा मृत्यू झाला होता.

३ ऑगस्टलाही मेटेंच्या गाडीचा पाठलाग झाला

पान १ वरून

मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी देखील या अपघाताची चौकशी व्हावी असे म्हटले आहे. आम्हाला कळविण्यात आलेल्या अपघाताची वेळ आणि प्रत्यक्ष झालेल्या अपघाताची वेळ, या वेगवेगळ्या आहेत याची चौकशी करावी.

यासंदर्भात बोलताना ज्योती मेटे म्हणाल्या, मी स्वतः डॉक्टर असल्याने त्यांना कामोठे रुग्णालयात पाहताच समजून आले, काहीतरी गडबड आहे. मेडिकल टरमिनॉलोजीनुसार, मृत्यूपश्चात माणूस पांढरा फटक पडत नाही. मेटे साहेबांचा चेहरा अतोनात पांढरा पडलेला होता. त्यांच्या नाक व कानातून रक्त येत होते. त्यानंतर मी माझ्या भावाला सांगितले ही घटना पाऊण तासांपूर्वी घडलेली नाही. हा अपघात होऊन किमान दोन तास झाले असतील. काही तरी आमच्यापासून लपवले जात होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही मेटेंच्या अपघाताची चौकशी व्हायलाच हवी, असे म्हटले आहे.